
(Marathi)

991
9191

1360 13 P

IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED
21 NOV 1930



1360

ठाणे जिल्हा सत्याग्रह मंडळाची

# प्रभातफेरी पद्यावली

किंमत १ आणा.

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1360
Date 12.1.72
GOVT. OF INDIA

## दोन शब्द.

या पद्यसंग्रहांत देशांतील तरुण पिढीच्या राष्ट्रीय वृत्तीस पोषक अशीं अनेक पद्यें आहेत. हीं ठाणे जिल्हा सत्याग्रह मंडळाच्या अर्नाळा शिबिरांत प्रभात फेरीच्या व इतर हरएक प्रसंगीं म्हटलीं जातात. तीं जिल्ह्यांतील पुढाऱ्यांस आवडून त्यांचा खेडोपाडीं प्रसार झाल्यास एक मोठेंच प्रचारकार्य होईल असे उद्गार त्यांनीं काढल्यावरून तीं छापविलीं आहेत. हीं सर्व ठिकठिकाणच्या खाजगी वह्यां-तून घेतलीं असल्यानें प्रत्येकाचा कर्ता कोण हें समजणें शक्य नव्हतें. अर्थात् त्यांचे व्यक्तिशः आभार मानतां येत नसले तरी सर्वांचे सामुदायिकरीत्या आभार मानणें हें माझें कर्तव्य आहे. पद्यावलीचीं पानें ३७ पर्यंत वाढलीं असूनहि किंमत कोणासहि जड पडूं नये म्हणून अगदीं अल्प म्हणजे एक आणा ठेविली आहे. तरी आबाल वृद्धांनीं हिचा अवश्य संग्रह करावा.

प्रकाशक.

# राष्ट्रिय पद्यें.

## वन्दे मातरम्.

सुजलां सुफलां मलयजशीतलाम्
शस्यश्यामलां मातरम् ॥ धृ० ॥
शुभ्रज्योत्स्नां पुलकितयामिनीं
फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीम्
सुहासिनीं सुमधुरभाषिणीं
सुखदां वरदां मातरम् ॥ वन्दे० ॥

---

## मातृभूमि वंदन.

अयि मातृभूमि ! तेरे चरणोंमें सिर नमाऊं ।
मै भक्तिभेट अपनी, तेरी शरणमें लाऊं ॥ धृ० ॥
माथें पे तू हो चंदन, छाती पे तू हो माला ।
जिव्हा पे गीत तू हो, मै तेरा नाम गाऊं ॥ १ ॥

सुपूत उपजे, गांधी टिळक जैसे ।
रस तेरी धूलिको मैं, निज सीस पे चढाऊं ॥ २ ॥
सेवामें तेरी सारे, भेदों को भूल जाऊं ।
वह पुण्य नाम तेरा, निशिदिन सुनूं सुनाऊं ॥ ३ ॥
तेरे ही काम आऊं, तेरा ही मंत्र गाऊं ।
मन और देह तुझ पर, बलिदान मैं चढाऊं ॥ ४ ॥

---

## राष्ट्रीय झेंडा

( चाल—आनंदकंद ऐसा... )

वंद्यांत वंद्य आम्हां । नवहिंद–राष्ट्र–झेंडा ॥धृ०॥
रमवीत हा जनाला । जमवीत वीरमाला ।
शमवील शत्रुबंडा ॥ नव० ॥ १ ॥
धरि सूत्रकर्मचक्र । प्रिय मार्ग तो अवक्र ।
सरल क्रियेंत गुंडा ॥ नव० ॥ २ ॥
भगवा विरक्तिरंग । तें हिंद अंतरंग ।
मोक्षक्रियेंत गुंडा ॥ नव० । ३ ॥
धवलत्वि इतर आर्य । हरितीं महंमदीय ।

ऐक्यक्रियेंत गुंडा ॥ नव० ॥ ४ ॥

प्यारे मुमुक्षु भाई । विनती तुम्हां सदा ही ।

हृदयांतुनी न सांडा ॥ नव० ॥ ५ ॥

स्वातंत्र्यमोक्षदाता । सायुज्यमोक्षदाता ।

जगिं हाच एक गुंडा ॥ नव० ॥ ६ ॥

सत्याग्रहप्रकारीं । सेवूनि निर्विकारी ।

करूं वंद्य सर्व खंडा ॥ नव० ॥ ७ ॥

रण शांतियुक्त खेळूं । रण शुद्ध मुक्त खेळूं ।

करूं वंद्य सर्व खंडा ॥ नव० ॥ ८ ॥

कारागृहांत राहूं । यमधर्मभेटि घेऊं ।

करूं वंद्य सर्व खंडा ॥ नव० ॥ ९ ॥

मिळवूनि भाइभाई । स्थापूनि लोकशाही ।

करूं वंद्य सर्व खंडा ॥ नव० ॥१०॥

---

## झेंडा वंदन.

विजयी विश्वतिरंगा प्यारा

झण्डा उंचा रहे हमारा ॥ धृ० ॥

सदाशक्ति बरसानेवाला
प्रेमसुधा सरसानेवाला
वीरोंको हरषानेवाला
मातृभूमिका तन मन सारा ॥ झण्डा० ॥ १ ॥

स्वतन्त्रताके भीषण रणमें
लखकर बढे जोश क्षणक्षणमें
कांपे शत्रु देखकर मनमें
मिटजावें भयसंकट सारा ॥ झण्डा० ॥ २ ॥

इस झंडेके नीचे निर्भय
ले स्वराज्य यह अविचल निश्चय
बोलो भारतमाताकी जय '
स्वतन्त्रता हो ध्येय हमारा ॥ झण्डा० ॥ ३ ॥

आवो प्यारे वीरो आवो
देशधर्मपर बलि बलि जावो
एक साथ सब मिलकर गावो
प्यारा भारतदेश हमारा ॥ झण्डा० ॥ ४ ॥

इसकी शान न जाने पाये
चाहे जान भलेही जाये
विश्वविजय करके दिखलाये
तब होवे प्रणपूर्ण हमारा ॥ झण्डा ॥ ५ ॥

---

## राष्ट्र गीत.

जनगण–मनअधिनायक जय हे, भारत भाग्य
विधाता ॥ ध्रु० ॥
पंजाब सिन्धु गुंजरात मराठा, द्राविड उत्कल बंग ।
विन्ध्य हिमाचल यमुना गंगा उच्छल जलधि तरंग ।
तव शुभ नामो जागे, तव शुभ आशिष मागे ।
गाहे तव जय गाथा ।
जनगण मंगलदायक जय हे, भारत भाग्य विधाता ।
जय हे! जय हे! जय हे! जय जय जय जय हे ॥ १ ॥
रात्रि प्रभातिल उदिल रविच्छबि पूर्व उदयगिरि भाले ।
गाहे विहंगम, पुण्य समीरण नव जीवनरस ढाले ।

तव करुणारुणरागे, निद्रित भारत जागे ।
तव चरणे नत माथा ।
जय जय जय हे जय राजेश्वर, भारत भाग्य विधाता ।
जय हे! जय हे! जय हे! जय जय जय जय हे ॥ २ ॥

---

## भारतीय स्वातंत्र्य.

लाभेल ह्याच काला । स्वातंत्र्य भारताला ॥
नामर्द हिंद सारा । बोले कुणी बिचारा ॥
बोलेल तोचि बोला । स्वातंत्र्य भारताला ॥
सविता कधीं न जेवीं । राहे निशा न तेवीं ॥
मग कां न शक्यतेला । स्वातंत्र्य भारताला ॥
हें काल चक्र फिरतें । स्थिरता मुळीं न त्यातें ॥
म्हणुनी बघाल डोळां । स्वातंत्र्य भारताला ॥
श्रद्धा पराक्रमाची । निष्ठा निजात्मतेची ॥
सामर्थ्य दे कृतीला । स्वातंत्र्य भारताला ॥
अन्य स्वतंत्र होती । येई सदैव दृष्टीं ।
संदेह तो कशाला । स्वातंत्र्य भारताला ॥

१

परमेश जो जगाचा । तो याचि भारताचा ॥
पद छत्र चामराला । स्वातंत्र्य भारताला ॥
नव बाल जन्म घेई । नव तेज तेज दावी ॥
नव दिव्य दिव्यतेला । स्वातंत्र्य भारताला ॥

---

## स्वातंत्र्य गीत.

कुणाला दास्य तें प्यारें । कुणाला आत्महित सारें ।
कुणाला नोकरी प्यारी । कुणाला बेडि सोनेरी ॥
मराठ्या मर्द होतासी । असा कां दीन बनलासी ॥
जरा धरि स्वाभिमानाला । मनीं स्मर शूर शिवबाला ॥
मुसलमीन हिंदु भाईनों । हिंदच्या वीर पुत्रांनों ॥
जिवाला जीव देऊं या । स्वराज्या आज मिळवूं या ॥
आम्हाला एक तें ठावें । स्वदेशा प्राण अर्पावे ॥
उशाला सर्प असतांना । अहा ही झोंप येइ कुणा ॥
आम्हीं स्वातंत्र्य प्राप्तीला । आतां हा देह वाहियला ॥

---

# हा हिंददेश माझा.

आनंदकंद ऐसा । हा हिंददेश माझा ॥
सत्यासि ठाव देई । वृत्तीस ठेवि न्यायी
सत्वास मानि राजा । हा हिंददेश माझा ॥१॥
जगदीश जन्म घेई । पदवीस थोर नेई ॥
चढवी स्वधर्म साजा । हा हिंददेश माझा ॥२॥
जनकादि राजयोगी । शुक, वामदेव त्यागी ॥
घुमवीति कीर्ति बाजा । हा हिंददेश माझा ॥३॥
दमयंति, जानकी ती । शीलास भूषवीती ॥
नटली नटेश गिरिजा । हा हिंददेश माझा ॥४॥
विश्वास मोह घाली । ऐशी मुकुंदमुरली ॥
रमवी जिथें निकुंजा । हा हिंददेश माझा ॥५॥
गंगा हिमाचलाची । वसती जिथें सदाची ॥
होऊनि राहि कालिजा । हा हिंददेश माझा ॥६॥
पृथु, राजसिंह, शिवजी । स्वातंत्र्यवीर गाजी ॥
करिती रणांत मौजा । हा हिंदहेश माझा ॥७॥
तिलकादि जीव देही । प्रसवूनि धन्य होई ॥

भरती स्व-लोककाजा । हा हिंददेश माझा ॥
जगिं त्याविना कुणीही । स्मरणीय अन्य नाहीं ॥
थोरांत थोर समजा । हा हिंददेश माझा ॥
पूजोनि त्यास जीवें । वंदोनि प्रेमभावें,
जये नाद हाचि गर्जा । 'हा **हिंददेश माझा**' ॥

---

## उद्बोधन गीत.

### भूपाळी.

रक्ष रक्ष ईश्वरा ! भारतां प्राचीना जनपदा ॥
भोगियली बहु, जयें एकदां, वैभवसुखसंपदा ॥ ध्रु० ॥
सगरद्वीपाहुनी; सिंधु तो काश्मीरापासुनी ॥
कृष्ण-कुमारीकडे शांतिचें राज्य देइ पसरुनी ॥ १ ॥
प्रेमभाव धरुनियां पुत्र हे, ऐक्य करुत झडकरी ॥
कर्तव्या जाणुनी, करूं दे कर्तव्यें हीं खरीं ॥ २ ॥
शाश्वत-सत्य-ज्ञान-दिवाकर, उगवो हृदयान्तरीं ॥
धर्म-तेज देखुनी, चाकित हो, देववृंद अंबरीं ॥ ३ ॥

गाढ तमीं बुडतसे राष्ट्र हें, उद्बोधन या करीं ॥
कृपा–कटाक्षें, पुन्हां चढूं दे वैभव–शिखरावरी ॥ ४ ॥
रोम–रंध्रिं चैतन्य खेळवीं, राष्ट्राच्या ईश्वरा ॥
सात समुद्रावरी फडकुं दे, यशो-ध्वजा सुंदरा ॥ ५ ॥
[ चाल ] हे पार्थ-सारथे, हे कंसारिविजयवन्ता ॥
हे एक-वचन रामा, हे धनुर्धरानन्ता ॥
सोडीं न यांस विकलां, हा काल असे पडता ॥
आर्य-पुत्र जरि अपात्र दिसले, घ्याया स्वीया पदा ॥
रक्ष भारता सहाय्यहीना, ईशा ! चिर–सौख्यदा ॥ ६ ॥

## श्री राम प्रार्थना.

हे घनःश्याम श्रीराम । वद आत्माराम ॥
स्वातंत्र्य सकळ गुणनिधि । समर्पुनि कधीं ।
पुरविशील काम ॥ध्रु०॥
त्वां अमेरिका सुखविली । स्वातंत्र्यें ॥
भू जपानची नटविली । स्वातंत्र्यें ॥

इटलीहि तशी हंसाविली । स्वातंत्र्यें ॥
मग आर्यभूच कां पारतंत्र्य कर्दमीं पचविशी ?। राम !॥ १ ॥
हे पक्षी तरुवरि गाती । स्वच्छन्दें ॥
काननीं त्यापरी रमती । मृगवृन्दें ॥
स्वातंत्र्य–सौख्य सेवीती । आनन्दें ॥
मग आम्हांलाच कां पारतंत्र्य-पंजरीं कोंडिलें ? राम ! ॥ २ ॥
दण्डिला दशानन तेव्हां । कोदण्डें ॥
सुर–वृन्द रक्षिले देवा । आनन्दें ॥
पाण्डवां राज्य दिधलें त्वां । गोविन्दें ॥
मग आम्हांवरिच कां दया न करशिल । मुनींद्र–
जनविश्राम ? ॥ राम ! ॥३॥

---

## सुंदर हिंदुस्थान.

सुंदर हिंदुस्थान आमुचें सुंदर हिंदुस्थान ॥
केवळ पंच प्राण आमुचें सुंदर हिंदुस्थान ॥
सकल जगामधिं छानआमुचें सुंदर हिं० ॥ध्रु०॥

बहुत पाहिले बहुत ऐकिले, देश परी ते सान ॥
सान मिसर पाताल आंग्लभू, सान चीन जापान॥ १ ॥
सकल गिरींवरि तुझाच गिरिवर, हिमालयचा मान ॥
कवण नदी दे श्रीगंगेसम, पूत सुधा–जल–पान ॥ २ ॥
कस्तूरी–मृग–परिमल–पूरित, जिचें फुलावें रान ॥
प्रभातकालीं कोकिल–किल-किल–कूजित-आम्रोद्यान॥ ३ ॥
यज्ञधूम–सौगंध–मनोहर, जिचें सामरव गान ॥
ऐकुनि येती देव कराया जिचें सोमरस–पान ॥ ४ ॥
तुझ्या जलांहीं अनंत पितरां दिलें तिलांजलि दान ॥
पितृभूमि तूं पुण्यभूमि तूं, तूं अमुचा अभिमान ॥५॥
जननि जगत्त्रयिं शक्त कोण, जो करिल तुझा अपमान ॥
प्राणदान सांसिद्ध असुनि त्वत् त्रिदश–कोटि संतान ॥६॥

---

## स्वातंत्र्य गान.

जो देशासाठीं मेला तो प्रिय भारी देवाला ॥
जो धर्मासाठीं मेला तो प्रिय भारी देवाला ॥

संतत ज्यांना पसंत परका । राजा तो झाला ॥
नरक तयाला असे ठेविला । स्वर्ग देशभक्ताला ॥जो०॥१॥
जात पात ना धर्म न अडवी । कधीं देश–कार्याला ।
उत्कट भक्ती श्री देशाची । भक्त भक्त तो ठरला॥जो०॥२॥
पारतंत्र्य नाशार्थ ग्रंथ तो । शिवरायानें लिहिला ॥
श्री बाजी तानाजी यांनीं । सत्य सत्य वाचियला॥जो० ॥३॥
कितीक जन तो ग्रंथ वाचुनी । आचरुनी मृत झाला ॥
पुनः पुन्हां परि नरवीरांनीं । पंथ तोचि आचरिला॥जो०॥४॥
स्वातंत्र्यास्तव देह झिजवुनी । यतींद्र स्वर्गा गेला ॥
दत्त भगत हे आजहि लढती । हर हर शंकर बोला॥जो०॥५॥

---

## मदिरेचा पाळणा.

जो जो जो जो गे, नीज सखे, मदिरे अरिकुळदिपके ॥
अक्षय घे निद्रा, धनहरके, त्रिभुवन संहारिके ॥जो०॥
पाळणा लांबविला, अवचीत, रात्रीं भरतभूमींत ॥
अमवास्येची हो, ती रात्र, उपजे ही सिंधूंत ॥ जो०॥
येती सात्वीक, धावोनी, भविष्य वदती वाणी ॥

कन्या रत्न असे, राक्षसिणी, स्पर्शु नका हो कोणी ॥जो०॥
जन्मे अशुभ दिनीं, ही कुमरी, स्पर्शिल त्यातें मारी ॥
लक्ष्मी घालविल, सागरीं, सद्बुद्धीतें हारी ॥ जो०॥
समान ते रंक, राव इशी, लोळवील भूमीशीं ॥
घेउनि सकळांच्या, द्रव्याशीं, शोषिल ही रक्तासी ॥जो०॥
कितिक इच्यापायीं, अबला हो, फोडतील त्या टाहो ॥
दुग्धाविण बाळें, रडती हो, परी सुटेना मोहो ॥ जो०॥
अधर्म वाढविल, ही फार, दुर्बळ होतिल वीर ॥
न करी कवण इचा, धिक्कार, पाश इचा अनिवार ॥जो०॥
यास्तव मदिरेच्या, नाशासी, करा त्वरा वेगेंसी ॥
जोंवरि पाय इचे, देशासी, तोंवरि सौख्य न त्यासी ॥जो०॥

---

## चरखा.

चरखा चला चला के । लेंगे स्वराज्य लेंगे ॥धृ०॥
मलमल जो हैं विदेशी । आणेको गज मिलेंगा ॥
खादी नहि त्यजोंगे ॥ लेंगे० ॥ १ ॥

बहोत्तेर करोड रुपिया । परदेश जा रहे है ॥
उसकू बचा बचाके । लेंगे० ॥ २ ॥
चरखोकि घणघणाट । रणभेरिया बजेंगे ॥
अंग्रेज को सुनाके । लेंगे० ॥ ३ ॥
या हक्क है हमारा । तनजानसेबि प्यारा ॥
मरणें नही डरेंगे । लेंगे० ॥ ४ ॥
हम सब परेड फौजी । कप्तान् हमारा गांधी ॥
आज्ञा उसीकि लेंगे । लेंगे० ॥ ५ ॥
तहेतीस करोड फौजी । रण सांथ ए चलेंगे ॥
गांधी हुकुम करेंगे । लेंगे० ॥ ६ ॥
चरखा हि तोफ बनेंगे । तकबा बने है बरची ॥
गोलेसे सूत्रके हम् । लेंगे० ॥ ७ ॥

---

## सत्याग्रही.

समरास सज्ज झाला । सत्याग्रही निघाला ॥ ध्रु० ॥
मोहीम रोखुनीया । रणशूर होउनीया ॥
संग्राम झुंजण्याला । सत्याग्रही निघाला ॥ १ ॥

सामर्थ्य वर्धवोनी । जगतास चेतवोनी ॥
काळाशि खेळण्याला । सत्याग्रही निघाला ॥ २ ॥
सत्यासमान नाहीं । जगिं वंद्य अन्य कांहीं ॥
पुरुषार्थ प्रेरण्याला । सत्याग्रही निघाला ॥ ३ ॥
श्रेष्ठांत श्रेष्ठ थोर । सेनानि क्रांतिकार ॥
स्वातंत्र्य घोषणेला । सत्याग्रही निघाला ॥ ४ ॥
अध्यात्म–योग भारे । विश्वास जो भरारे ॥
स्वातंत्र्य सेवनाला । सत्याग्रही निघाला ॥ ५ ॥
योगींद्र तो महात्मा । जो हिंद–देश आत्मा ॥
थरकांपवी जगाला । सत्याग्रही निघाला ॥ ७ ॥
यशवंत वीर भाझा । विजयी करूनि काजा ॥
हा आश्रमांत यावा । सत्याग्रही निघाला ॥ ७ ॥

---

## झेंडा-वंदन.

नवहिंद राष्ट्रझेंड्या । प्रणामा घे या ॥ ध्रु० ॥
हिंदभूमिच्या हिंदि जनांच्या । स्वाभिमान चिन्हा ॥
स्वराज्य माझें मीहि त्याचा । जगता सांगाया ।

स्वातंत्र्याच्या वाऱ्यावरतीं । बा फडफडणाऱ्या ॥
हिंदपुत्र हे सिद्ध तुझ्यास्तव । प्राणहि अर्पाया ॥
नव्या मनूचे शिलेदार हे । नमिती तुजला या ॥

---

## वंदेमातरम्.

हिंदि जनहो बोला आतां मंत्र वंदे मातरम् ।
शुद्ध सुंदर अति मनोहर मंत्र वंदे मातरम् ॥ ध्रु० ॥
वीर सारे व्हा लढाया पूर्ण स्वातंत्र्या वरा ।
देह सजवायास आतां शुद्ध खादी वापरा ॥
माल सोडा तो विदेशी दैन्य आलें भारता ।
दारु सोडा सर्वनाशी व्यर्थ कां हो प्राशितां ॥
वीर बहु गेले तुरुंगीं स्वस्थ कैसे बैसलां ।
दुष्ट कानू सर्व मोडा मंत्र गांधीनीं दिला ॥
मुक्त करुनी मातृभूमि आजि स्वातंत्र्या वरा ।
नाशुनी सैतानि सत्ता ताप जगताचा हरा ॥

---

## स्वराज्याची प्रभात.

परवशतेचा काळ खरोखर, झडकरि हो सरणार ।
अंबरिं स्वराज्य रवि येणार ॥
भारत देशा, अखिल दुर्दशा क्षणामधीं पळणार ।
तुझा तूं धनी स्वतः होणार ॥
छाति कुणाची तुला देखण्या, नच कधिंहि धजणार ।
शत्रू मनांत थरथरणार ॥
विभवयुक्त तव पराक्रमाचा डंका दुमदुमणार ।
जगाला वचक सदा देणार ॥
स्वराज्य रवि हा अंबरिं येतां, प्रसन्नता रमणार ।
झेंडा अखंड फडफडणार ॥
स्वराज्य रविच्या चंड प्रतापें धुकें अखिल पळणार ।
सारे चंडोलहि गाणार ॥
देशभक्तिच्या सामर्थ्यानें स्वतंत्रता येणार ।
शौर्यें त्रिखंड तें घुमणार ॥
भारतभूमि स्वतंत्रतेच्या कालामधिं नटणार ।
पुनरपि सुवर्ण–भू बनणार ॥

## प्रभु प्रार्थना.

भो पाहि पाहि ईशा, या आर्त आर्य देशा ।
सूर्यास राहु जैसा, ग्रासीच कलह तैसा ॥
स्वातंत्र्य नष्ट झालें, कलहेंचि त्रस्त केलें ।
रजपूत राज्य जाई, बुडलीहि पेशवाई ॥
इतिहास देइ ग्वाही, परि बुद्धि नष्ट होई ।
स्वातंत्र्य आर्यमूला, ऐश्वर्यही तियेला ॥
परिपूर्ण प्राप्त व्हाया, सद्गूण देइ राया ।
निःस्वार्थि वृत्ति देई, कीं ऐक्य वृद्धि होई ॥
मद्देश बांधवांसी, सद्बुद्धि प्रेरि ऐशी ।
स्वीकारी अल्प सेवा, प्रार्थी सदाहि देवा ॥

---

## कर्तव्य.

घेवोनि जन्म बाला, त्यानें कृतार्थ केला ।
कर्तव्य पालनानें, क्रमिलेंचि आयु ज्यानें ॥
स्मरणीय वंद्य विभुति, चिरकाल त्यांची कीर्ती ।
सन्मार्गवर्ति सर्वा, चारित्र्य हृदयिं ठेवा ॥१॥

नभमंडळीं प्रकाशे, दैदीप्यमान भासे ।
उपकृत करी जनासी, देई प्रकाश त्यांसी ॥
कर्तव्य बंधनानें, तैसा निसर्गतेनें ।
तिमिरारि सज्ज झाला, कर्तव्य पालनाला ॥ २ ॥

लक्ष्मी गजांत ज्याची, अनुरूप पत्नि साची ।
सौख्योपभोग ज्यांना, होती विनम्र चरणां ॥
त्यागोनि राज्य–लक्ष्मी, रमणीहि, बुद्ध स्वामी ।
सिंहासनासि मुकला, कर्तव्य पालनाला ॥ ३ ॥

इतिहास उदधि मथितां, आनंद होय कथितां ।
रत्नें अमूल्य मिळती, त्यांची अशक्य गणती ॥
परदास्य चक्र भरणा, दुःखासि नाहि गणना ।
असहाय दीन त्रस्ता, आपुली पुनः भूमाता ॥
स्वातंत्र्य विभव सौख्या, मांगल्य तीस द्याया ।
स्वप्राण अर्पियेला, कर्तव्य पालनाला ॥ ४ ॥
पृथुराज वंद्य राणा, कर्तव्यनिष्ठ ताना ।
शिवबाहि पूज्य सर्वां, केली स्वदेश सेवा ॥

सर्वस्व होम केलें । कष्टासि सर्व सहिलें ।
सकला सुबोध दिधला । कर्तव्य पालनाला ।।
बळवंत गांधि दास । लाला सुरेंद्र घोष ।।
शिकवीत कर्म योग । आला आम्हा सुयोग
स्मृति दिव्य सतत ठेविं । उपदेश हाचि सेवी, ।।
कटिबद्ध होई बाळा । कर्तव्य पालनाला ।। ६ ।।

---

## स्वराज्य— नौबद.

भूपाळी

दिशा फांकल्या स्वराज्य–रवि हा उदयाचलिं आला ।
स्वराज्य–नौबद झडूं लागली ' हर हर महादेव' बोला ।।ध्रु.।।
प्रभात–फेरी वदे हिंदुना अरुणोदय झाला ।
स्वातंत्र्याचा मंत्र ' हर हर महादेव ' बोला ।।
प्रभात झाली उठा हिंदु हो कार्य करायाला ।
स्वातंत्र्याचा विजय शब्द तो ' हर हर महादेव ' बोला ।।
आर्यभूमि ही धाय मोकली बद्ध असे झाली ।
लोह–शृंखलीं गुलामगिरिच्या तिला बांधियेली ।।

हिंद–बंधु हो तिच्या मुलांनो गुलाम तुम्हि झालां ।
लाज न वाटे तुम्हां कशी ती षंढ तुम्ही बनलां ॥
आंग्ल–करांतुनि आर्यभूमिला मुक्त करायाला ।
उठा हिंदु हो धरा करीं त्या स्वराष्ट्र–झेंड्याला ॥
उठा मर्द हो टाकुनि निद्रा प्रभात हा झाला ।
राष्ट्र–ध्वज तो करीं धरुनियां निघा लढायाला ॥
प्रभात फेरी वदे तुम्हांला अरुणोदय झाला ।
स्वराज्य–नौबद झडूं लागली 'हर हर महादेव' बोला ॥ध्रु.॥
फुकट बोलणें टाकुनि द्यावें सज्ज तुम्ही व्हावें ।
इंग्रज–करिंचें राज्य आपुलें हिसकुनि तुम्हि घ्यावें ॥
छी थू तुमची जगीं होतसे गमत न लाजेला ।
काळीं ठिक्कर मुखें जाहलीं उठा धुवायाला ॥
झुंजा अरिशीं रणमल्ल मांडा भांडा जोरानें ।
दुही मोडुनी कुटा अरीला खंबिर ऐक्यानें ॥
उठा मर्द हो वेळ पातली स्वराज्य–रवि आला ।
उदयाचलिं तो दिसूं लागला अरि धरि भीतीला ॥

चला मर्द हो एक होउनी स्वराज्य घ्यायाला ।
आर्यभूमिची लाज बाळगा वदतों तुम्हांला ॥
आर्यभूमिची लज्जा राखा तशी पूर्वजांची ।
शूर वीर हो रणीं ठाकुं या करूं शर्थ शौर्याची ॥
चला मर्द हो एक होउनी स्वराज्य घ्यायाला ।
स्वराज्य–नौबत झडूं लागली ‘ हर हर महादेव ’ बोला ॥ध्रु॥
क्रिश्चन भाई, पारशि भाई मुसलमान भाई ।
हिंदुभूमिचे सुत ते सारे भरतभू त्यांस आई ॥
सुपुत्र आम्हीं भिडवुनि खांदे जाउं लढायाला ।
मुक्त करूं या मायभूमिला सोडुनि द्वैताला ॥
राष्ट्र–मुखाचा कलंक धुउनी टाकूं या आतां ।
अरिरुधिराचा तिलक लावुनी रक्षूं गोमाता ॥
संगर करण्या रणीं जाउं या राष्ट्र–मंगलाला ।
रणशौर्यातें दावूं आपण मिरवुं विजय–माला ॥
संगर–तांडव घोर करूं या स्वराज्य घ्यायाला ।
स्वराज्य–नौबद झडूं लागली ‘हर हर महादेव’ बोला ॥ध्रु.॥

मिठास पट्टी इनकम पट्टी तेलाची पट्टी ।
कितीक पट्ट्या पोशिति नौकरशाहीची लठ्ठी ॥
हिंदभूमि ही पिळुनी नेती सर्वाचि संपत्ती ।
तयामुळें ही सर्व पसरली दारिद्यापत्ती ॥
शस्त्रास्त्र न तें धरावयाला आम्हांस ते देती ।
अशस्त्र ऐशा आर्यजनांना खुशाल बडवीती ॥
लाज न त्यांना भूतदयेची रावणी राज्य त्यांचें ।
नको अम्हां तें मोडुनि पाडूं जुवाड दुष्टांचें !
सौमित्राची विनती ऐका चला लढायाला ॥
स्वराज्य नौबद झडूं लागली 'हर हर महादेव' बोला ॥ध्रु॥

---

## आधि नमुं गंगाधर सुता.

आधि नमु गंगाधर सुता ॥
आद्य स्वदेशी व्रत जनिता ॥ ध्रु ॥
आजन्म खडतर व्रत आचरि जो ॥
आर्य जननिचा सुखदाता ॥ आधि० ॥

अलोट बुद्धि वैभव ज्याचें ।
कर्मयोग जो प्रसरविता ॥ आधि० ॥
नाम बाळ परि कीर्ति थोर ती ।
सुमार्ग सकलां दाखविता ॥ आधि० ॥
रामदास–सुत नम्र होउनि ।
ठेवितसे तत् पदिं माथा ॥ आधि० ॥

---

## हिंदी मातृगीत.

भारत हमारा देश है, हित उसका निश्चय चाहेंगे ॥
उसके हितके कारणे हम् कुछ न कुछ कर जायेंगे ॥भा.॥
भारत हमारी मातृभूमि, उसका ऋण हम्पर है बहूत ॥
उसके मिटानेके लिये हम् कुछ न कुछ कर जायेंगे ॥भा.॥
भारतके दुःखप्रद अवनतिपर क्यौं नहि अश्रु बहावेंगे ॥
उसके हटानेके लिये हम् कुछ न कुछ कर जायेंगे ॥भा.॥
धर्म विद्या और धनसे उन्नति भारतकी होवे ॥
उस उन्नतिके मार्ग में हम् कुछ न कुछ कर जायेंगे ॥भा.॥

---

## महात्माजींचें वैष्णव गीत.

वैष्णव जन तो तेने कहिये, जे पीड पराई जाणे रे ।
परदु:खे उपकार करे तोये, मन अभिमान न आणे रे ॥
सकळ लोकमां सहुने वंदे, निंदा न करे केनी रे ।
वाच काछ मन निश्चळ राखे, धन धन जननी तेनी रे ।
समदृष्टि ने तृष्णात्यागी, परस्त्री जेने मात रे ।
जिव्हा थकी असत्य न बोले, परधन नव झाले हाथ रे ॥
मोह माया व्यापे नहि जेने, दृढ वैराग्य जेना मनमां रे ।
रामनामशुं ताळी लागी, सकळ तीरथ तेना तनमां रे ॥
धनलोभी ने कपटरहित छे, काम क्रोध निवार्या रे ।
भणे नरसैंयो तेनुं दरशन करतां, कुळ एकोतेर तार्यां रे ॥

---

## मदिरेचा प्रताप.

नकोरे छंद धरूं मदिरेचा ।
करितसे नाश सकलांचा ॥ धृ० ॥
मदिरा मोहक वरि वरि दिसते ॥
रोग भयंकर शरिरीं आणिते ॥

विगलित गात्रें सर्वहि करिते ॥
नाश करी शरिराचा ॥ नको रे० ॥
जी सुखदायी मदिरा वाटे ॥
नाना परिचीं उभीं संकटें ॥
सकल संपदा लावी वाटे ॥
नाश करी अब्रूचा ॥ नको रे० ॥
मदिरा ही पापांची राणी ॥
कीं नरकाची केवळ खाणी ॥
विनवी सर्वां जोडुनि पाणी ॥
त्यजरे संग तियेचा ॥ नको रे० ॥

---

## हमारा हिंदुस्तान.

सारे जहांसे अच्छा, हिंदुस्तान् हमारा ।
हम् बुलबुले है उसके, व गुलिस्तां हमारा ॥
पर्वत है सबसे ऊंचा, हम् साय आसमांका ।
यह संतरी हमारा, वो कारवा हमारा ॥

गोदीमे खेलती है, नदियां वहै किनारे ।
सदियोंसे आसमां है, ना मेरवां हमारा ।।
मिसरो युनान रौमा, सब् मिट् गये जहांसे ।
बाकी मगर है अबतक्, नामो निशां हमारा ।।
मजहब् नही सिकाता, आपसमें वैर रखना ।
हम् हिंदि है बतन है, हिंदिस्तां हमारा ।।

---

## स्वातंत्र्याचा उषःकाल.

स्वदेश की जय स्वराज्य की जय उठा उठा गात ।
स्वातंत्र्याचा शुभ मंगल रवि उदयाला येत ।।
उठा बंधुनो उठा भगिनिनो हिंदभूमि गा गा ।
जीवभाव हा विसरुनि आतां कार्याला लागा ।।
हा रामाचा हा कृष्णाचा भीमाचा देश ।
इथें जन्मले छत्रपतीसम अनेक सिंहेश ।।
हा गांधींचा हा टिळकांचा दासांचा देश ।
इथें जन्मले लालाजीसम अनेक सिंहेश ।।

हाय हाय परि कहर गुजरला दीड शतक झालें ।
प्रिय मातेच्या कुशींत घुसले असंख्यात भाले ॥
शस्त्रें गेलीं उदीम गेला गेली संपत्ती ।
लाथा या परक्यांच्या खातां प्राण नयनिं येती ॥
घर बुडव्यांचा दिवाभितांचा भरला बाजार ।
विष-वल्लीनें सर्व बाजुनीं खचला संसार ॥

( चाल )

देशांत माजला कहर ।
जाहला जीव बेजार ।
तुम्हि स्वस्थ कसे बसणार ।

चला चला तरि हें तरुणांनो कर्तव्या जागूं ।
गुलाम-गिरिच्या बेड्या तोडूं आत्मबळें वागूं ॥
हा येतो कां तो येइल कां वाट अशी वीर ।
कधीं न पाहे, उभा एकटा समरीं रणधीर ॥
हा तरुणांचा नव शक्तीचा आशेचा काळ ।
स्वातंत्र्याचें जन्मा येतें तरुण रुचिर बाळ ॥
कृतांत थर थर कांपे पाहुनि तरुणांना नित्य ।

यशश्रिचें मुख होतें पाहुनि तरुणां आरक्त ॥
या तरुणांनीं मुक्त करुनियां चीन सुखी केला ।
तुर्कव्यानें संघटुनीयां तुर्क मुक्त केला ॥
गुलामगिरिचे पाश तोडुनी जे जे वर चढले ।
ते ते सारे देश उभे या तरुणांनीं केले ॥
आजहि येथें हांक मारिते तरुणांना माता ।
चला तरी रे चला संघटूं प्रिय देशाकरितां ॥
मग वाट कुणाची बघतां ।
तो हरी पाठिशीं असतां ।
तो गांधि पाठिशीं असतां ।
करा गर्जना स्वदेश की जय ठोका रे दंड ।
बंड कशाचें परदास्याचे करुं या शतखंड ॥

---

## दास्यविमोचन.

स्वदेश व्हावा मुक्त जरी या दास्यांतुनि आज ।
तरी बंधुनों एकजुटीनें युद्धा व्हा सज्ज ॥
सभा, भाषणें, जयध्वनी, हीं वर्तमानपत्रें ।
मातृभूमिला सुखी कशीं हीं करितिल स्वातंत्र्यें ॥

विना कष्टतां, विना झुंजतां, कोण सुखी झाला ? ।
कोण सोडुनी घरांत बसला राज्य भिउनि बोला ? ॥
स्वातंत्र्याचा मार्ग सतीचें वाण रोख धर्म ।
प्रत्यक्षचि हें इथें करावें, लागतसे कर्म ॥

देउनी बळी देहाचा ।
स्त्री पुत्र जनक जननीचा ।
धन धान्य गेह मित्रांचा ।

जें जें प्रिय तें मातृभूमिसी अर्पावें लागे ।
वीरवरांच्या अशाच येते स्वतंत्रता मागें ॥
देश राहिला उभा, पेटला वणवा देशांत ।
तुफान झालें महा भयानक लोक समुद्रांत ॥
दारिद्र्याची आग उसळली देश दग्ध झाला ।
घांस मिळेना एक वेळचा भारत वर्षाला ॥
कारागिरिची दशा जाहली रडते ढळढळ ती ।
कारागारीं निजबंधूंचे आत्मे तळमळती ॥
या परक्यांनीं सर्व बाजुनीं देश ठार केला ॥
कल्पतरूचा वृक्ष झोडला हाय बहरलेला ।

ही काय दशा देशाची ।
जाहली हानि धर्माची ।
दुर्दशा किती संस्कृतिची ।
कसें सुचतसे तुम्हां रुचतसे जिणें दैन्यवाणें ।
गाड्या घोडे दागदागिने खेळ चैन खाणें ॥
देश देविला ठेवुनि साक्षी देश आज उठला ।
स्वातंत्र्याचा गुलाल उधळुनि जोहाराचि केला ॥
मरूं वरूं वा स्वातंत्र्या तुज वीर गर्जनेनें ।
आव्हानाचि हें दिलें शत्रुला प्रिय सेनापतिनें ॥
तो देशाचा प्राण, शत्रुचा काळ गांधि वीर ।
उभा राहिला लढावयाला हातीं धरुनि शीर ॥
अशा समयिं या स्वातंत्र्याच्या या झेंड्याखालीं ।
उपादेवि ही आनंदानें आज पहा न्हाली ॥
हा रंग उधळि बजरंग
गांधिनीं बांधिला चंग ।
करु चला कायदेभंग ।
हांसत उसळत आत्मबलाची कांस घट्ट घालूं ।
आज आज या क्षणीं चला रे दास्य सर्व जाळूं ॥

# हा विमल ध्वज खादीचा.

भारतीयांचा हा विमल ध्वज देशाचा ।। ध्रु० ।।
नमत नाहि हा कलिकालाला ।
नमत नाहि हा अन्यायाला ।।
नमत नाहि पाशवी बलाला ।।
एक देवाला, नमितो हा ध्वज खादीचा ।। १ ।।
सनातना आरक्त दर्शवी ।
हरितानें इस्लाम भूषवी ।।
धवल सकल धर्मांस शोभवी ।
तीन रंगांचा, हा विजयध्वज देशाचा ।। २ ।।
त्यावरि जें शुभ चक्र विलसतें।
लीन भारता रक्षायातें ।
येइ सुदर्शन ऐसें गमतें ।
चक्र चिन्हाचा, हा विमल ध्वज खादीचा ।। ३ ।।
धर्म बुडाला न्याय लोपला ।
विश्वासाचा घातहि झाला ।

कसें पहावे आर्या तुजला ।
धर्म-युद्धाचा, करिं घे हा ध्वज खादीचा ॥ ४ ॥
हिंद भूमिच्या या जनतेला ।
तनु अर्पावी जन-सेवेला ।
वदतो ऐसें तोचि शोभला ।
पूत मायेचा, मिरविल हा ध्वज खादीचा ॥ ५ ॥
परवशतेच्या तीव्र यातना ।
हलवितील ज्या ज्या जीवांना ।
भक्ति-मार्ग हा दावि अशांना ।
आत्मशुद्धीचा, हा विमल ध्वज खादीचा ॥ ६ ॥
तरुणांच्या स्वार्थत्यागानें ।
श्रेष्ठांच्या तपसामर्थ्यानें ॥
परमेशाच्या कृपाबलानें ।
यशस्वी झाला, हा विजय-ध्वज खादीचा ॥ ७ ॥
आत्म बलाचा केवळ आत्मा ।
भारतासि भूषण जो आत्मा ।

दुनिया ज्याला वदे महात्मा ।
अशा श्रेष्ठाचा, हा प्रसाद आहे साचा ॥ ८ ॥
देशासाठीं उभारिला हा ।
धर्मासाठीं उभारिला हा ।
प्रेमासाठीं उभारिला हा
धर्म युद्धाचा करिं घे हा ध्वज देशाचा ॥
निधी ऐक्याचा, हा विजय-ध्वज खादीचा ॥ ॥ ९ ॥
राष्ट्राच्या प्राणाचा ठेवा ।
सकलांनीं हा सांभाळावा ।
पंचप्राणें ओवाळावा ॥
अशा मानाचा, वंदूं हा ध्वज खादीचा ॥ १० ॥

## राष्ट्रोन्नतीचा मार्ग.

देश बुडाला दरिद्रि झाला ह्या परदेशी कपड्यानें ॥
जाळा पोळा झडकरि त्याला उपदेशियलें गांधीनें ॥ ध्रु० ॥
स्वदेशीच तो कपडा आतां वापरण्याचा नियम करा ॥

राष्ट्राज्ञा ती पाळुनि सक्रिय स्वराज्य घेण्या त्वरा करा ॥देश.॥
गत ऐश्वर्या मिळवायाला त्याग करा हो मदिरेचा ॥
राक्षशीण ती शिरली येथें उडविल धुव्वा सर्वांचा ॥देश.॥
स्वराज्य देवी तुम्हांसि बाही फोडुनि टाहो आशेनें ॥
रामदास-सुत प्रार्थि गणेशा पुरवी आशा प्रेमानें ॥देश.॥

## राष्ट्र-मंत्र.

**( चालः—राधेकृष्ण बोल मुखसे )**

ऊठ हिन्द वीर युवका । सुप्रभातिं बोल,
" वन्दे मातरम् " अमोल । युवका मंत्र हाचि बोल ॥ धृ. ॥
गांधि वीर थोर महात्मा ।
भारत भूमीचा जो आत्मा
बोधितो तुम्हांसि आतां
मंत्र हाचि बोल, " वंदे मातरम् " अमोल ॥ १ ॥
गेहिं गेहिं फिरत चरखा ॥
देइ आंग्ल हृदयिं चरका ॥
हाकलोनि पार परका ॥
मंत्र हाचि बोल, " वंदे मातरम् " अमोल ॥ २ ॥

वापरोनि वस्त्र विदेशी ॥
का विटाळित देहासी ॥
शुध्द माल घ्या स्वदेशी ॥
मंत्र हाचि बोल, " वंदे मातरम् " अमोल ॥ ३ ॥
युवका मंत्र हाचि बोल ॥ धृ० ॥

---



मुद्रकः—

मोरेश्वर चिंतामण लेले, बी. ए.

"विक्रम प्रिंटिंग प्रेस" गिरगांव, मुंबई.

प्रकाशकः—

आप्पाजी पांडुरंग मुळे,

चिटणीस, ठाणे जिल्हा कॉंग्रेस कमिटी,

उंबरगांव, जि. ठाणे.